नि.फौ. प्र. क्र. – ५७७/२०१५
सरकार वि. मो. जाकीर
**निशाणी क्र. २९**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. ९ यांचा शपथेवर जबाब</u>**

**<u>सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | – | संगीता श्रीकृष्ण कडू, |
| **वय** | – | ४० वर्ष, धंदा – शेती |
| **राहणार** | – | कवठा, ता.– वरुड, जि.– अमरावती |

---

**<u>सरकारतर्फे सरतपास श्री. एम. ए. यावले, सरकारी वकीलांतर्फे</u>**

**१.** मी आरोपींना ओळखत नाही. मला एक मुलगी कोमल व मुलगा सौरभ आहे. आम्ही वरुड येथे लग्नाला माझा मुलगा,मुलगी व इतर नातेवाईक असे गेलो होतो. तेथून परत येतांना आम्ही वरुडवरुन बस दुपारी ०४.०० वाजता मध्ये बसलो. खेखर्डा फाटयावर मोर्शीवरुन एक ट्रक येत होता. तो समोरून आदळला त्यामुळे बसचा पत्रा कापत गेली. त्यामुळे आम्ही एकमेकांच्या अंगावर पडलो. मी चालकाच्या बाजूने बसलो होतो. माझी मुले सुध्दा माझ्या बाजूने बसले होते. त्या अपघातामुळे बसचे काच आमच्या डोक्यावर पडले व माझ्या मानेला तसेच पायाला लागले होते. माझ्या मुलाला हाताला लागले होते. बस मधील इतर प्रवास्यांना देखील लागले होते. त्यानंतर बस थांबली व आम्हाला मोर्शी येथील सरकारी दवाखान्यात उपचाराकरीता नेण्यात आले. मी ज्या बसमध्ये बसलो होतो त्या बसचा क्रमांक मला सांगता येणार नाही. मला त्या ट्रकचा सुध्दा नंबर सांगता येणार नाही. मोर्शी येथील सरकारी दवाखान्यानंतर माझ्या मुलीला अमरावती येथील राठी दवाखान्यात उपचाराकरीता नेले होते. ट्रक समोरुन कसा आला हे मला सांगता येणार नाही. माझी मुलगी कोमल सध्या शेंदुरजनाघाट येथे आहे. मुलगा सौरभ पुण्याला आहे.

**<u>साक्षीदाराने अभियोग पक्षाला पाठींबा दिला नाही त्यामूळे सरकारी वकीलांनी साक्षीदाराला उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली–परवानगी मंजूर.</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, सायंकाळी ०५.०० चे दरम्यान लाखारा फाटा येथे एक ट्रक भरधाव वेगाने चालत येवुन बस सोबत धडक झाली होती. हे मला माहीत नाही की, बसची धडक एका बैलगाडीला लागली होती व त्या बैलगाडीच्या चालकाला सुध्दा मार लागला होता. हे मला माहीत नाही की, त्या ट्रकचा नंबर एम एच ३१ / एम ८०७५ व बसचा नंबर एम एच ४०/ एन ८६८४ असा होता. आता मला माझ्या बयानातील अधोरेखांकित भाग 'अ', 'ब' व 'क' वाचुन दाखविला. तो बरोबर नाही. पोलीसांनी तो माझ्या बयानात का लिहीला याचे कारण मी सांगु शकत नाही.

**<u>उलटतपास आरोपी तर्फे श्री. डी. पी. सदापूरे विधीज्ञ</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, समोरुन ट्रक कसा आला हे मला सांगता येणार नाही. मी पोलीसांना खेखर्डा फाटा येथे अपघात घडल्याचे सांगीतले होते तसेच बसचे काम आमच्या डोक्यात गेले होते, माझ्या मुलाला हाताला लागले होते, माझ्या मुलीला अमरावती येथील राठी दवाखान्यात उपचाराकरीता नेले होते या बाबी माझ्या जबाबात नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. घटना कशी घडली या बाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास – पुर्ण</u>**

**<u>फेरतपास – नाही</u>**

वा.दा.ब.अ.क.केले

THAKARE ISHWAR JAMSING

Digitally signed by THAKARE ISHWAR JAMSING
Location: CJJD & JMFC, WARUD
Date: 2026.02.11 17:06:23 +0530

**(आय. जे. ठाकरे)**

दिनांक : ११/०२/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. १,वरुड.